क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचा-यांच्या अनुपस्थितीबाबत

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

**शासन परिपत्रक क्रमांक :- आस्थाप - २००८ /प्र.क्र.१२८/जल २,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**

**दिनांक ७ मे, २००८**

वाचा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय-१००५/व्हीआयपी-४/ प्र.क्र.३५/०५/१८ / (र.व का.) दि. ३/१०/२००५

२) मुख्य अभियता, लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर), पुणे यांचे क्र. मु.अ/लपा/आ-१/१८८७/०८ दि. १९/४/२००८ चे परिपत्रक

शासन परिपत्रक :-

नुकत्याच झालेल्या विधानमंडळांच्या सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनादरम्यान लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद व लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर) च्या क्षेत्रीय कार्यालयांना विधानमंडळ कामकाजाच्या संदर्भात सकाळी ११.०० वाजेदरम्यान दुरध्वनी केले असता जबाबदार अधिकारी वर्ग कार्यालयात उपस्थित रहात नसल्याचे आढळुन आले आहे. यासाठी देण्यात आलेली कारणमिमांसा असमर्थनिय होती. विधानमंडळाच्या अधिवेशनादरम्यान क्षेत्रीय कार्यालयातील उपरोक्त स्थिती विचारात घेवुन मुख्य अभियता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर) पुणे यांनी संदर्भाधीन दिनांक १९/४/२००८ च्या परिपत्रकान्वये लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर) यंत्रणेस आवश्यक त्या सुचना दिल्या आहेत.

२. याचदरम्यान विधान परिषद अतारांकित प्रश्न क्र. ३७६४४ उपस्थित करण्यात आला असुन सदर प्रश्नान्वये क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी वर्ग कार्यालयात आठवडयातुन २-३ दिवस उपस्थित रहात असल्याचे व अनुपस्थितीच्या काळात साईट व्हिजीट / दौरे / मिटींगा अशी कारणमिमांसा देण्यात येते. सदर काळात संबधित अधिकारीं न भेटल्यामुळे सामान्य जनतेस नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे सदर प्रश्नात नमुद केले आहे.

३. वस्तुत: संदर्भाधीन क्र. १ येथील परिपत्रकान्वये सर्व शासकिय कार्यालयातील कर्मचा-यांना कार्यालयात वेळेत उपस्थित रहाण्याबाबतचे निर्देश देण्यात आले असुन सदर निर्देशांची अमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. तसेच सदर निर्देशांची अमलबजावणी होत नसल्यास कारवाई करण्याबाबतही स्पष्टता करण्यात आली आहे, असे असतानाही लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद व लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर) कार्यालयात अधिकारी/कर्मचारी वेळेत उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे. लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद व लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर) कार्यालयांकडुन लघु पाटबंधारे योजना राबविण्यात येतात. सदर कामे कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागात हाती विखुरलेल्या स्वरुपात असतात. सदर कामांवर पर्यवेक्षीय / तांत्रिक नियंत्रण ठेवण्यासाठी साईट व्हिजीट / दौरे करणे हे संबधित अधिका-यांच्या कर्तव्याचा अविभाज्य भाग आहे , हे मान्य केले तरी त्यामुळे कार्यालयास कामानिमित्त भेट देणा-या जनतेची गैरसोय टाळणेही आवश्यक आहे .प्रस्तुत अतारांकित प्रश्नात नमुद केलेली वस्तुस्थिती तसेच परिच्छेद १ मधील अनुभव विचारात घेवुन खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे :-

*१) कर्तव्याचा भाग म्हणुंन आयोजित करण्यात येणा-या साईट व्हिजीट / दौ-यांचे कार्यालयात जास्तीत जास्त काळ उपस्थिती राहील, ही बाब विचारात घेवुन नियोजन करावे.*

EST

21 MAY 2008

EST-V

D:\maraleG,R.15

२) साईट व्हिजीट / दौ-यांसाठी नजिकच्या वरिष्ठ अधिका-यांच्या मान्यतेने आठवड्यातील ठराविक दिवस निश्चित करावेत. व त्याबाबतची माहिती कार्यालयाच्या नोटिस बोर्डावर प्रदर्शित करावी जेणेकरुन सामान्य जनतेस याबाबत माहिती मिळल्यामुळे त्यांची गैरसोय कमी करता/ टाळता येईल.

३) याकाळात कार्यालयास कामानिमित्त भेट देणा-या जनतेची गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी

४) अपवादात्मक परिस्थितीत उद्‌भवलेल्या दौ-याबाबत नजिकच्या वरिष्ठ अधिका-यास याबाबत लेखी स्वरुपात अवगत करुन मान्यता घ्यावी.

५) प्रत्येक संबधित अधिका-याने भेटी दिलेल्या साईट / दौरे याबाबत वेगळी नोंदवही ठेवावी तसेच संबधित योजनास्थळी असलेल्या नोंदवहीतही याबाबत नोंदी ठेवाव्यात.

६) साईट व्हिजीट / दौ-यांचे दिवस वगळता उर्वरित दिवशी नियमितपणे कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ९.५५ वाजता कार्यालयात उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

उपरोक्त सुचनांची अमंलबजावणी करणे ही संबधित कार्यालय प्रमुखाची जबाबदारी असुन सदर सुचनांचे अनुपालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास संबधित कार्यालय प्रमुखास जबाबदार धरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिलीप शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर) पुणे
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद
४) अधिक्षक अभियंता , लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर ) मंडळ , पुणे/ ठाणे/ नागपुर/ अमरावती/औरंगाबाद/ नाशिक
५) सर्व कार्यकारी अभियंता , लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर ) विभाग ,
६) सर्व कार्यकारी अभियंता , लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद.
७) निवडनस्ती

क्रमांक/आस्थापना/५/कमअनु/२००८
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी दि. २८-५-२००८

प्रति,
१. उपविभागीय अधिकारी (सर्व)
२. तहसीलदार (सर्व)
३. विशेष भूसंपादन अधिकारी (सर्व)
४. शाखाप्रमुख (सर्व)